# भिंत खचली छप्पर थिजले
# होते नव्हते सारे गेले..
# शिक्षणाचे पापण्यांमध्ये
# स्वप्न मात्र तेवढे उरले..

ही शिक्षण हक्क कायद्याची
अंमलबजावणी की पायमल्ली ?



भिवंडी तालुक्यातील पिसे शासकीय आश्रमशाळेची इयत्ता ३ रीच्या वर्गातील विद्यार्थी अभ्यास करत असताना अचानक कोसळलेली भिंत.

शासनाच्या निवाऱ्याला वंचित मुलं अजून किती काळ
शिक्षणासाठी उन्हात ताटकळणार ?



भिवंडी तालुक्यातील पिसे शासकिय आश्रमशाळेची इयत्ता ३ रीच्या वर्गातील विद्यार्थी भिंत कोसळल्यानंतर झाडाखाली अभ्यास करताना

रिकाम्या टाक्या.. तहानलेली मुलं!
हंड्यातलं पार तळाशी गेलेलं पाणी आपल्या चोचीनं
खडे टाकून पिणारा तहानलेला कावळा
काऊ-चिऊच्या गोष्टीतून थेट आश्रमशाळेत!



नाशिक येथील इगतपुरी तालुक्यातील शिरसाटे आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना अशा प्रकारे पाण्याची गैरसोय होती.

संविधानाने देऊ केलेल्या शिक्षणाच्या मूलभूत हक्काची
ऊब फाटक्या स्वेटरमधून कशी पोहोचायची ?



नाशिक येथील इगतपुरी तालुक्यातील शिरसाटे आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना अशा प्रकारचे फाटके स्वेटर्स वितरीत केलेले आढळले.

समर्थन
अर्थसंकल्प अभ्यास केंद्र

# आश्रमशाळांची दुरावस्था...

**राज्य अर्थसंकल्पात आदिवासी विकास विभाग दुर्लक्षितच:**

- राज्यात वर्ष २००१ च्या जनगणनेनुसार आदिवासी लोकसंख्या ८५ लाख ७७ हजार असूनही राज्य अर्थसंकल्पापैकी ३ टक्केही रक्कम खर्च होत नाही.
- आदिवासींच्या कल्याणासाठीचा १० टक्के निधी अखेरच्या तीन महिन्यांत खर्चिला जातो!
- वर्ष २००४-०५ ते वर्ष २०११-१२ पर्यंत आदिवासी विकास विभागासाठी वर्षाला सरासरी रु. २ हजार ३५० कोटी २६ लाख इतका निधी खर्च करण्यात येतो जो वर्ष २०१३-१४ च्या राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत केवळ १.२१ टक्के आहे.
- वर्ष २००४-०५ पासून वर्ष २०११-१२ पर्यंत विभागाला योजनांसाठी सुधारित अंदाजाइतका निधी कधीच उपलब्ध झालेला नाही.
- वर्ष १९९३-९४ पासून वर्ष २०१२-१३ पर्यंत म्हणजेच आदिवासी उपयोजना कार्यान्वित करण्यात आल्यापासून आदिवासींना त्यांच्या हक्काच्या रु. ८ हजार ३३१ कोटी ८८ लाखांपासून वंचित ठेवण्यात आले.
- डॉ. जयंत पाटील याच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या समितीच्या निकषानुसार आरोग्य, शिक्षण, व पोषण या क्षेत्रासाठीच्या नियतव्ययामध्ये वर्षानुवर्ष घट होत आहे.

**राज्यातील आदिवासींची सद्यस्थिती दयनीय:**

- आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनुसूचित जमातींच्या एकूण ६,३४,५८० कुटुंबांपैकी ५,७८,१३६ म्हणजे ९१.११ टक्के कुटुंबे ही दारिद्र्यरेषेखाली आहेत.
- २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण ५२.२ टक्के आहे.
- वर्ष २०११-१२ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकांनूसार महाराष्ट्रात २२.३ टक्के साधारण कमी वजनाची (कुपोषित) आदिवासी बालके आढळून आली तर ४.५ टक्के अति कमी वजनाची आदिवासी बालके आढळून आली.
- नवसंजीवणी योजनेअंतर्गत ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात (२००७-१२) २७ हजार ७६५ बालमृत्यू झाले होते.
- आदिवासी उपयोजनेच्या वर्ष २००९-१० च्या आकडेवारीनुसार राज्यात एकूण ५५१ शासकीय आश्रमशाळा असून त्यातील १३९ प्राथमिक व ४१२ माध्यमिक स्वरुपाच्या आहेत तसेच एकूण ५५६ अनुदानित आश्रमशाळांपैकी ८९ प्राथमिक व ४६७ ह्या माध्यमिक स्वरुपाच्या आहेत.

(वरील मुद्द्यांबाबतचा तपशील समर्थनच्या अर्थसंकल्पावरील विभागवार टिपणांमध्ये पहावा)

## आदिवासी क्षेत्रातील आश्रमशाळा व रुग्णालयांची दुरावस्था!

**समर्थन संस्था व श्रमजीवी संघटना यांनी महाराष्ट्र विधानसभा सदस्य व लोकलेखा समिती सदस्य विवेक पंडित यांच्या समक्ष नाशिक, ठाणे, पुणे व रायगड जिल्ह्यांमध्ये दौरे करुन आदिवासी भागातील काही आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, व ग्रामीण रुग्णालयांचे पंचनामे केले असता त्यातून निदर्शनास आलेले महत्त्वाचे निकष:-**

नाशिक जिल्ह्यातील वैतरणा, शिरसाठे, आंबोली, तसेच ठाणे जिल्ह्यातील न्याहाळे, नांदगाव, पिसे, गुंज, दाभोसा, परळी, देहरे, दादडे, रायगड जिल्ह्यातील सुधागड येथील जांभुळपाडा व पुण्यातील मावळ येथील काही शासकीय आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, उपकेंद्र व जिल्हा रुग्णालये यांना प्रत्यक्ष भेट देऊन फेब्रुवारी व मार्च २०१३ रोजी श्रमजीवी संघटना व समर्थन या संस्थेने महाराष्ट्र विधानसभा सदस्य व लोकलेखा समिती सदस्य श्री. विवेक पंडित यांच्या समक्ष पंचनामे केले त्यातून खालीलप्रमाणे काही महत्वाचे निकष निदर्शनास आले जे अतिशय गंभीर असून त्यावरून शासनाची आदिवासींप्रती व आदिवासींच्या विकासाप्रती उदासिनता दिसून येते.

- **शहापूर तालुक्यातील पेंढरघोळ आश्रमशाळा दहावीच्या परिक्षेचे केंद्र असल्याकारणाने जागेच्या अभावी तेथील मुख्याध्यापकांनी ऐन परिक्षेच्या वेळेस इयत्ता १ ली ते ९ वी च्या विद्यार्थ्यांना २० दिवसांची सुट्टी देऊन घरी पाठविले होते.**
- वाडा तालुक्यातील गुंज, जव्हार तालुक्यातील न्याहाळे, दाभोसा, देहरे, नांदगाव, दादडे, भिवंडीतील पिसे नाशिक जिल्ह्यातील त्रंबक तालुक्यातील आंबोली व इगतपूरी येथील वैतरणा या शासकीय आश्रमशाळांमध्ये स्नानगृहे व शौचालये नादुरुस्त असल्याकारणाने मुले व मुलींना शौचालयास व आंघोळीसाठी बाहेर ओढ्यावर किंवा नदीवर जावे लागत होते.
- भिवंडीतील पिसे शासकीय आश्रमशाळेची इमारत ही सन १९८० रोजी भातसा प्रकल्पासाठी बांधण्यात आलेली इमारत आहे व तिचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे असून त्यातच मुलांचे वर्ग व निवासाची व्यवस्था आहे. **सदर आश्रमशाळेची इयत्ता ३ री च्या वर्गाची दिनांक ११ फेब्रुवारी २०१३ रोजी रात्री ८.३० च्या दरम्यान भिंत कोसळून ७ मुले जखमी झाल्याचे देखील निदर्शनास आले.**
- जव्हार येथील देहरे शासकीय आश्रमशाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध झाला असुनही इमारत अद्यापही बांधण्यात आलेली नाही, तर विक्रमगड येथील दादडे येथील आश्रमशाळेसाठी निवासी इमारत मंजूर असूनही बांधण्यात आलेली नव्हती.
- जव्हार येथील दाभोसा शासकीय आश्रमशाळेमध्ये पिण्याच्या पण्याची सोय नव्हती तर पाणी विकत घेतले जात असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले.
- जव्हार तालुक्यातील दाभोसा आश्रमशाळेतुन वैद्यकिय सुविधांची वारंवार मागणी करुनही सदर सुविधा अद्यापही मिळालेल्या नाहीत.
- भिवंडीतील पिसे, वाडा तालुक्यातील गुंज, जव्हार येथील देहरे या आश्रमशाळांमध्ये निवासी मुला-मुलींना झोपण्यासाठी स्वतंत्र खोल्या उपलब्ध नव्हत्या, चादरी, ब्लँकेट देखील जुनेच वापरात आणले जात होते.
- नाशिक जिल्ह्यातील वैतरणा, शिरसाठे, आंबोली, तसेच ठाणे जिल्ह्यातील न्याहाळे, नांदगाव या शासकीय आश्रमशाळांची परिस्थिती पाहता आश्रमशाळांमध्ये मुलांना आंघोळीसाठी पाणी नव्हते तर स्नानगृहे व स्वच्छतागृहांची अवस्था इतकी बिकट होती की त्यांचा वापरच होत नसल्याचे दिसून

आले.

- नाशिक येथील इगतपूरीतील शिरसाटे आश्रमशाळेत जागेचे मालक गोपाळ लहानगे हे स्वत:च भाजीपाल्याचे कंत्राट घेऊन भाजीपाला पुरवित होते. तसेच त्यांच्या पत्नी अनिशा गोपाळ लहानगे ह्या शाळा व्यवस्थापन समितीवर असल्याचे निदर्शनास आले.
- **पंचनामा केलेल्या सर्व आश्रमशाळेत साखर ही केवळ २६ जानेवारी व १५ ऑगस्ट रोजीच ती देखील राष्ट्रीय सणाकरिताच उपलब्ध होत होती.**
- पंचनामे केलेल्या सर्वच आश्रमशाळांमध्ये वर्गखोल्या, भांडारगृह, स्वयंपाक गृह व धान्यांची कोठारे अस्वच्छ होती तर धान्यांचा दर्जा हा अतिशय निकृष्ट स्वरुपाचा आढळून आला.
- पंचनामे केलेल्या सर्वच आश्रमशाळांमध्ये एक फळ म्हणून 'सडक संत्र' दिलं जात होतं (**महाराष्ट्र स्टेट कंझ्युमर फेडरेशन यांच्याकडून घोडेगाव, जिल्हा पुणे येथील एक ठेकेदार नेमण्यात आला आहे ज्याने उपठेकेदार नेमले आहेत व त्यांच्याकडून राज्यातील सर्व आश्रमशाळांना अशाप्रकारची संत्री पुरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले)**
- जव्हार तालुक्यातील दाभोसा, देहरे, न्याहाळे, नांदगाव येथे विद्यार्थ्यांना ८ ते १० दिवसातून एकदा अंडी दिली जात होती.

**अपुऱ्या आरोग्य सुविधाः**

- **सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कक्ष (ward), शौचालये व स्वच्छता गृह अतिशय अस्वच्छ अशा स्वरुपाचे होते.**
- **पतंगशहा कुटीर रुग्णालय, जव्हार येथील सर्जन एम.एम. नागरगोजे हे नियुक्त झाल्यापासुनच सलग दिड वर्षाहून** अधिक काळ गैरहजर असल्याचे **निदर्शनास आले.**
- **पंचानामे केलेल्या सर्व आरोग्य संस्थांमध्ये औषधांचा तुटवडा होता व जो साठा होता त्यांचा पुरवठा देखील वेळेवर होत नसल्याचे निदर्शनास आले.**
- **वैतरणा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दाखल रुग्णांना जेवणाची सोय वैद्यकीय अधिकारी स्वत:च्या भत्त्यांतील पैशामधून करतात.**
- **जव्हार ग्रामीण रुग्णालयातील दाखल रुग्णांना पाण्याअभावी शौचालयासाठी चक्क बाहेर जावे लागत होते.**
- **मोखाडा ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीगृहाची अवस्था फारच बिकट होती, बालरोग तज्ज्ञांची जागा रिक्त होती, स्टॉक रजिस्टर व हजेरी पट रोजच्या रोज भरले गेले नव्हते, रुग्णांना पेपर वर जेवण दिले जात होते. रुग्णालयामध्ये पुरेसे बेड, चादरी, ब्लँकेट देखील नव्हते.**

## राज्यशासनाला आदिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्यापेक्षा ठेकेदार प्यारे!

राज्यातील शासकीय आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना राज्यशासन एकीकडे सडलेली संत्री, किडलेले धान्य देत असून दुसरी कडे Micronutrient Supplement **हे सूक्ष्म अन्नघटक असलेले सिरप विद्यार्थ्यांना पुरविण्यासाठी गुणवत्तेबाबत वाद असलेल्या 'हिंदुस्तान लॅबोरटरीज, ठाणे' या कंपनीकडून खरेदी का करीत आहे ? जे सिरप पंचनामा केलेल्या सर्वच आश्रमशाळेत कोणताही विद्यार्थी पित** नसल्याचे निदर्शनास आले. यावरुन राज्यशासन आदिवासी विद्यार्थ्यांच्या आरोग्या बाबत विचार न करता ठेकेदारांना पोसण्याचेच काम करीत आहे हे स्पष्ट होते.

**सदरचे सिरप विद्यार्थी पित नसून सुद्धा १० कोटींचा 'सिरप पुरवठा आदेश' देण्यात आला आहे याबरून कंपनीच्या सिरप पुरविण्यामध्ये मोठा घोटाळा असण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही.**

राज्यशासनाने 'हिंदुस्तान लॅबोरटरीज, ठाणे' या कंपनीला दिलेला आदेश:

क्र. शाआशा-२०११/प्रक्र १३०/का १०(१)
आदिवासी विकास आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य नाशिक,
दिनांक: २५ जानेवारी, २०१२

**आदेश:-**

- **आयुक्त आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य नाशिक हे त्यांच्या अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना** Micronutrient Supplement **हे सुक्ष्म अन्नघटक असलेले सिरप पुरविणेसाठी उपरोक्त सरनामा क्रमांक १ व २ च्या अधिन राहून सरनामा क्र. ५ व ६ अन्वये शासनाने दिलेल्या मंजूरीनुसार हिन्दुस्थान लॅबोरटरीज, ठाणे यांना खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देत आहेत.**

| अक्र | शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्या | प्रति विद्यार्थी प्रतिदिन २० gm चा डोस | १०० दिवसांसाठी एकूण डोस gm | प्रति बाटली २०० gm प्रमाणे एकूण बाटल्यांची नगसंख्या | प्रति २०० gm बाटलीची किंमत रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०९९०३ | ४१९८०६० gm | ४१९८०६००० gm | २०९९०३० | ४९.५० | १०,३९,०१,९८५ |
| | | | | | एकूण | १०,३९,०१,९८५ |

## पंचनामा

शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, शिरसाटे
ता. इगतपूरी, जि. नाशिक

आज दिनांक २८/२/२०१३ रोजी वेळ दुपारी १२.४५ वाजता. मान. आमदार श्री. विवेक पंडित, पत्रकार श्री रामकृष्णन व सुधिर कोंडाळे, मा.बाळाराम भोईर सरचिटणीस श्रमजीवी संघटना, मा.अशोक सापटे ता.अध्यक्ष श्रमजीवी संघटना, श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्या जया पारधी, सौंदी वैद्य, भगवान मधे व समर्थन या संस्थेचे प्रतिनिधी गुरुनाथ सावंत यांनी शासकीय प्राथमिक आश्रमशाळा, शिरसाटे ता. इगतपूरी, जि. नाशिक येथे भेट दिली असता व पाहणी केली असता सदर आश्रमशाळा हि आदिवासी विभागामार्फत शिरसाटे ता. इगतपूरी येथे चालविली जात होती परंतु सदर गावात जागा उपलब्ध नसल्याने सध्या ती लहांगेवाडी (वाडीवरे) ता. इगतपूरी या ठिकाणी सुरु आहे. इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत आश्रमशाळा चालू असून या शाळेत १०८ मुले व १०७ मुली शिक्षण घेत आहेत असून निवासी मुलं ९७ व ९८ मुली आहेत.

सदरची आश्रमशाळा नोव्हेंबर २००९ साली सुरू झाली असून अजूनही शाळेला इमारत नाही. गोपाळ दगडू लहानगे या शेतकऱ्याच्या जागेत त्यांच्या इमारतीत भाड्याने आश्रमशाळा सुरू आहे. जागेचे मालक गोपाळ लहानगे हेच पंचायत समिती सदस्य देखील असल्याचे मुख्याध्यापक यांनी सांगितले. कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी कुठल्याही प्रकारची सुविधा नसल्याने दररोज १ कर्मचारी किंवा शिक्षक मुलं झोपत असलेल्या ठिकाणी ते राहतात. या आश्रमशाळेत एकूण ८ कर्मचारी असून ८ शिक्षक १ अधिक्षक, १ अधिक्षकि आहेत शाळेला शिपाई नाहीत.

२६ हजार महिन्याला भाडं दिलं जातं. स्वयंपाक घराची पाहणी केली असता काल संध्याकाळी (२७/२/२०१३) जेवणामध्ये भाजी नसल्याचे तेथील कर्मचाऱ्याने सांगितले. स्वयंपाक घरात भांडी अस्वच्छ तसेच मसाला व हळद वाईट परिस्थितीत ठेवण्यात आली होती. दुपारचे जेवण होते व ते पाहिले असता त्यामध्ये कांदा, लसूण आत कोंथिबीर, मिरची इत्यादी पदार्थ वापरण्यात आले नव्हते. धान्यकोठारामध्ये चवळी, मटकी ही टोस लागलेली व धुळीने भरलेली आहे. दैनंदिन स्टॉक रजिस्टर वर आलेल्या धान्याची व दिलेल्याची नोंद नव्हती. भिंतीवरील सुविचार (मराठीत) व्यवस्थित लिहिलेले नसल्याचे दिसले. ७ वीच्या विद्यार्थिनीला इंग्रजीत तिच्या नावाची स्पेलिंग विचारली असता ती सांगता किंवा लिहिता आली नाही. स्टॉकची पाहणी केली असता जास्तीचे स्वेटर, ब्लँकेट, सतरंजी आढळून आले. तसेच बूट ही जास्त आढळून आले. वसतिगृहात ४५ मुलं राहतात. मुलांना वाटप केलेल्या स्वेटरची पाहणी केली असता. मुलांच्या अंगापेक्षा स्वेटरची साईज ही खूप लहान व फाटलेल्या अवस्थेत होती. एका मुलाला स्वेटर बाबत विचारले असता हा स्वेटर गेल्या वर्षी दिला असल्याचे सांगण्यात आले. वसतिगृहात राहणाऱ्या मुलांच्या अंगाची अवस्था ही खूप खराब होती. त्यांचे केस वाढलेले होते. अंग अस्वच्छ होते. वसतिगृहात पाण्याची व्यवस्था नसल्याने कोणत्याही मुलांनी आंघोळ केली नव्हती. मुलांना विचारले असता, फक्त शनिवार व रविवारी आंघोळ करतात बाकीचे दिवस असेच राहतात अशी माहिती समोर आली. मुलांना स्वच्छ आंघोळ करण्यासाठी शिक्षक व अधिक्षक हे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे आंघोळीसाठी पाण्याचा अभाव असल्याकारणाने मुली देखील रोज आंघोळ करत नसल्याचे निदर्शनास आले.

कार्यलयामधील कपाटे पाहिली असता. अनेक पुस्तक स्टॉकला तशीच असलेली दिसून आली व मुख्याध्यापकांकडून हा स्टॉक दिवाळीला आला आहे असे सांगण्यात आले. कुसेगाव, सिरसाटा, मोजळा या गावातील मुलांकरिता हा स्टॉक येथे येतो अशी माहिती रविंद्र शांताराम बोंबले (स्थानिक रहिवाशी) यांनी दिली. तसेच मुख्याध्यापकांच्या बाजूचे कपाट उघडून पाहीले असता संगणक (कॉम्प्युटर) बंद अवस्थेत आढळला.

वसतिगृहात राहणाऱ्या ४६ मुली आहेत. २ शौचालय आहेत. तसेच २ दिवसांत स्त्री अधिक्षिका मातृत्व लाभाच्या सुट्टीवर जाणार असल्याचे स्त्री अधिक्षिका यांच्याकडून समजले. मुख्याध्यापक डी. यु. पिंपळ हे डी.एड. झालेले असून ते ५वी व ६ वी ला विज्ञान शिकवितात. मुलं-मुलींना रविवारी धरणावर आंघोळ करण्यासाठी नेलं जातं.

मुख्याध्यापक व अक्षिक्षक यांच्यात पट सांगतांना गोंधळ होत होता. मुख्याध्यापक यांना पटसंख्येबाबत विचारले असता पट - २१५, डेस्कॉलर- २०, रहिवाशी मुली ४५, मुलं - ५० असे सांगण्यात आले. आश्रमशाळेतील मुलांनी शाळेत चाललेला अवर्तणुकीचा प्रकार सर्वांसमोर सांगितला ते पुढीलप्रमाणे - मुलां-मुलींना कांदे, बटाटे अशा पद्धतीने सर्वांसमोर टोमणे मारतात. सडलेली संत्री दिली जातात. जेव्हा त्या संदर्भात बोलले असता तुमच्या बापाच्या घरचे आहे का ? अशी भाषा अधिक्षक वापरतात. अधिक्षक मुलांना मारझोड करतात. खेळतांना बॅट मोडली म्हणून गोट्या या मुलाला अधिक्षकांनी खूप मारझोड केली आहे. तसेच अधिक्षक हे आमच्यासोबत राहत नाहीत ते कालच (२७/२/२०१३) आले. मुलांना येणारे खाद्य, अंडी व फळं, मटण हे अधिक्षक त्यांच्या खोलीवर नेतात. सडलेली फळ आणण्याचे काम यतीन पाटील, रा. नाशिक हे करतात.

शाळा व्यवस्थापन समितीवर जागा मालकांची पत्नी अनिशा गोपाळ लहांगे या आहेत. पिण्याचे पाणी आणण्यासाठी शाळेतील मुलं अर्धा किलोमीटरवर असलेल्या विहिरीवर जातात. वसतिगृहात २ शौचालय आहेत तेही फक्त मुलींसाठी आहेत. मुलांना उघड्यावर आंघोळ करावी लागते.

ही वस्तुनिष्ठ पाहणी करताना शिरसाठे आश्रमशाळेचे मुख्याध्यापक डी. यु. पिंपळे व अधिक्षक जे. एल. बनकर यांच्या समक्ष केली आहे.

सदर पंचनामा दुपारी २:०० वाजता संपविला.

# पंचनामा

शासकीय आश्रमशाळा पिसे, ता. भिवंडी

आज दि.१३/०२/२०१३ रोजी वेळ सकाळी १०:३० वाजता शासकीय आश्रमशाळा पिसे, ता. भिवंडी हि शाळा मौजे. भादाणे. येथे ग्रुप ग्रामपंचायत तळवली अर्जुनली हद्दीत महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग विश्रामगृह भातसा वसाहतीत इयत्ता १ली ते ७वी पर्यंत भरते येथे मा.बाळाराम भोईर सरचिटणीस श्रमजीवी संघटना, मा.अशोक सापटे ता.अध्यक्ष श्रमजीवी संघटना, श्री.केशव पारधी मा,सचिव श्रमजीवी संघटना व संघटनेचे कार्यकर्ते तसेच मुख्याध्यापक श्री. आर.आर.वाणी यांचे सोबत भेट दिली असता व पहाणी केली असता इयत्ता तिसरीचा वर्ग भरतो तेथे त्या वर्गखोलीची उत्तर दिशेची भिंत आतल्या बाजूने व काही भाग बाहेरच्या बाजूला जमिनीपासून पूर्णपणे कोसळून पडलेला होता, त्याबाबत मुख्याध्यापक श्री. आर. आर. वाणी यांना विचारले असता दि. ११/०२/ २०१३ रोजी रात्री ८;३०च्या दरम्यान मुले अभ्यास करत असतांना भिंत अचानक कोसळून पडली त्या वेळेस १२ मुलं अभ्यास करत होती, त्यातील ७ मुलांना दुखापत झाली, त्यांची नावे १) गणेश किसन मुकणे २) कैलास चेदर खाले. ३) स्वपान देऊ बाबर. ४) जितू शंकर बाबर.५) रोशन भगवान कवटे. ६)शंकर मधुकर पवार. ७) बळाराम केशव बळवा या मुलांना पडघ्या प्रथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, तेथेच ७ मुलांना I.G.M रूग्णालयात भिवंडी येथे नेण्यात आले, ती आता बरी आहेत, तसेच ती इमारत धोकादायक असतांनाही बाजूच्या रुम मध्ये इ, ४ थीचा वर्ग भरला होता, कारण विचारले असता दुसरीकडे जागा नसल्यामुळे तसेच तिथून बाहेरच्या परिसरात इयत्ता ३री चा वर्ग झाडाखाली भरला होता, तेथे शिक्षक अद्यापनाचे काम करीत होते, तेथून आम्ही स्वयंपाक घरात गेलो असता ती खोली १०×१० ची आहे, तेथेच गॅस तेथेच सर्व काही तेथेच असल्याने परिसर गलिच्छ वाटत होता, व जागा अपुरी असल्यामुळे बाहेर चुलुंबा केलेला होता. आहारात अंडी दिली जात नाहीत सौर उर्जा नाही. एकंदरीत विकट परिस्थिती आहे,

तेथून निवासामध्ये गेले असता सन १९८० पूर्वी भातसा प्रकल्पाची इमारत बांधलेली आहे ती अतिशय निकृष्ट दर्जाची इमारत आहे.त्यातच ही मुलं झोपतात. दिवसा वर्ग भरतो व रात्री तेथेच झोपतात काही मुलांना विचारले असता सतरंजी, ब्लँकेट, चटई असते असे सांगितले तसेच रात्री तहान लागली तर प्लास्टीकचे ड्रम, ग्लास असतो. तसेच इयत्ता ३री च्या विजय अनंता मुकणे या मुलास विचारले रात्री शौचालयास कुटे जातो तर शेजारच्या शेतात एकट्यालाच जावे लागते असे सांगण्यात आले अशी दैनावस्था आहे.

तसेच या आश्रमशाळेत एकूण ८४/१०४ मुली रात्री निवासी थांबतात यांच्यावर लक्ष व देखरेखेसाठी महिला निवासी अधिक्षिका श्रीम. संध्या काळू घोडे यांची नेमणूक आहे पण त्या प्रती नियुक्ती काम खुटल आश्रम शाळेवर आहेत. शौचालयाची व्यवस्था पाहिली असता एकच शौचालय(एकच बाथरुम) आहे. त्यात काही जातात व काही १० ते १४ वयाच्या मुली उघड्यावर जातात असे समजले तसेच अधिक्षिका नसल्याने त्या मुलींना मासिक पाळीच्या वेळेस सॅनिटरी पॅडची व्यवस्था नाही असेही सांगण्यात आले आहे. जणू काही निवास व शौचालयाच्या बाबतीत कोंडवाड्यासारखी अवस्था होती.

तसेच ९७/११३ मुलगे निवासी थांबतात त्यांना शौचालयासाठी बाजूच्या शेतातच जावे लागते व उघड्यावरच आंघोळ करावी लागत आहे.त्याच्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही याच वेळेस काही मुलं शेतातून शौचालय करून येताना दिसली.

पंचनामा चालू असतांना मा. सुनिल शिंदे तहसिलदार भिवंडी व त्यांचे सोबत इतर सहकारी या ठिकाणी भेट देण्यास आले त्यांनी सुध्दा वरील परिस्थितीची पाहाणी केली व संजय भोईर टी.व्ही चॅनेलवाले आले होते.

**पाणी** :- ११३ मुलगे व १०४ मुलींना पिण्याच्या पाण्याची ५००० लिटरची पाण्याची टाकी आहे व टाकी जवळ नळ आहेत तेथेच जाऊन पाणी पितात असे शिक्षकांना व मुलांना विचारले असता समजले व तेथेच मुलगे -मुली आंघोळ करतात असे मुलांनी सांगितले.

वीजे बाबत पाहणी केली असता प्रत्येक रुममध्ये एक बल्ब आहे व रस्त्यामध्ये छोटे बल्ब दिसले.

आरोग्याबाबत पाहणी केली असता एक पेटी आहे त्यात ताप, पोटदुखी, जुलाबाच्या गोळ्या आहेत अगदी छोटी पेटी आहे ती अधिक्षक एम.एस.वाघ हे बघतात व ती पेटी त्यांच्या घरी असते.

एकंदरीत ही शाळा २००५ साली पिसे येथे मंजूर झाली तिथे जागा व खोल्या उपलब्ध नसल्याने ती सन २०१०साली तळवली अर्जुनली ग्रुप ग्राम पंचायतमध्ये महाराष्ट्र शासन पाटबंधारे विभाग विश्रामगृह भातसा वसतिगृहात दोन इमारती हस्तांतरित केल्या आहेत व एक वर्ग वाढल्याने जो वर्ग पडला तिथे मुलं बसू लागले. तसेच याच वेळी मा.सुनिल शिंदे तहसिलदार यांनी वर्तमानपत्रात बातमी वाचून येथे आले असता जागेबाबत संघटनेच्या कर्मचाऱ्याने विचारले असता जागेचा मूळ प्रस्ताव २००९ साली पाठवला असुन त्याच्यात दुरुस्ती करून नविन प्रस्ताव क महसूल/ कक्ष- १/टै- ८/कावि ५९५८५/ सी.आर- १२ दि.३१/१२/२०१२ रोजि कलेक्टर (जिल्हा अधिकाऱ्याकडून) कोकण आयुक्ताकडे पाठवला असून पाठपुरावा चालू आहे असे सांगण्यात आले.

तसेच श्री. भरत धानके शिक्षक स्टाफ बाबत विचारले असता- पुरुष शिक्षक १ व महिला शिक्षक ५ व १ पुरुष मुख्याध्यापक आहेत व १ पुरुष अधिक्षक आहे व जी महिला अधिक्षक आहे ती खुटल (मुरबाड) तालुक्यात आहेत व यातील १ पुरुष शिक्षक, १ पुरुष अधिक्षक , १ मुख्या व १ कामाठी थांबतात व बाकी घरी जातात. याबाबत श्री.दत्तात्रेय कोलेकर जिल्हा उपाध्यक्ष श्रमजीवी संघटना यांनी अडचणी विचारून त्याबाबत दखल घेऊ असे सांगितले.

हा पंचनामा दुपारी १२:३० वाजता संपवण्यात आला.

प्रकाशक : समर्थन - अर्थसंकल्प अध्ययन केंद्र, ११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई (पूर्व) ठाणे. दूरध्वनी : ०२५० २३९० १०३
E-mail : samarthanmumbai97@gmail.com Web : www.samarthanadvocacy.org

# आश्रमशाळेतल्या विद्यार्थ्यांना खावे लागते सडके अन्न !

## इतक्या निकृष्ट पोषणावर वाढणारी ही पिढी भारताचं भवितव्य जगाच्या पटलावर झळकवण्यासाठी सक्षम ठरेल का?

पंचनामा केलेल्या जवळ जवळ सर्वच आश्रमशाळांमध्ये अशाप्रकारचा निकृष्ट स्वरुपाचा धान्यसाठा आढळला.



पुणे जिल्ह्यातील वडेश्वर आश्रमशाळेत सापडलेले सडलेले गहू



पंचनामे केलेल्या सर्व आश्रमशाळेत मुलांना देण्यात येणारी संत्री अशी सडलेली होती (महाराष्ट्र स्टेट कंझ्युमर फेडरेशन यांच्याकडून घोडेगाव जिल्हा पुणे येथील एक टेकेदार आहे ज्याने एक उपठेकेदार नेमलेला असून त्याच्याकडून राज्यातील सर्व आश्रमशाळांना अशाप्रकारची सडलेली संत्री पुरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले)



नाशिक जिल्ह्यातील वैतरणा आश्रमशाळेत सापडलेले भेसळयुक्त व सडलेले वाटाणे



पंचनामे केलेल्या सर्वच आश्रमशाळेत सापडलेली भेसळयुक्त व सडलेली तूरडाळ



नाशिक जिल्ह्यातील वैतरणा आश्रमशाळेत सापडलेला भेसळयुक्त व सडलेली चवळी



पुणे जिल्ह्यातील वडेश्वर आश्रमशाळेतील एका खोलीमध्ये ठेवलेल्या धान्यांच्या सडलेल्या गोणी.(यातील १० गोणी गहू किडलेल्या अवस्थेत होते तर कडधान्याचे नमुने घेतले असता वाटाण्याच्या गोणी मध्ये दगड होते.)